# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com


वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 21 जुलै 2020.

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26

दिनांकः- 30/07/2020.

**विषय:- कोरोना 19 विषाणुमुळे उध्दभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याचे दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा नगर पालिका क्षेत्रात दुचाकी वाहनांना प्रतिबंध करणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये कोविड-19 च्या रुग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून उमरगा नगर पालिका क्षेत्रामध्ये होत असलेला कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून संदर्भ क्र. 4 अन्वये दि. 25.07.2020 चे 00.00 वाजलेपासून दि. 01.08.2020 चे मध्यरात्रीपर्यंत उमरगा नगर पालिका क्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 नुसार संचारबंदी लागू करण्यात आली आहे.

ज्याअर्थी भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे आदेशानुसार दुचाकी वाहनांवर फक्त एक व्यक्तीस (चालकास) प्रवास करण्याची परवानगी असून अनेक दुचाकीस्वारांकडून या नियमाचे उल्लंघन होत असल्याने त्यांचेविरुद्ध पोलिस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. यानंतरही नगर पालिका क्षेत्रामध्ये अनेक दुचाकीस्वारांकडून वारंवार नियमाचे उल्लंघन होत असल्याचे दिसून आले आहे. तसेच कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांनी अनावश्यकरित्या बाहेर न पडणे गरजेचे असून अनेक दुचाकी रस्त्यावर अनावश्यकरित्या फिरत असल्याचे निर्दशनास आले आहे. यामुळे उमरगा नगर पालिका क्षेत्रामध्ये कोविड-19 चा प्रादुर्भाव वाढत असून तो रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना



Scanned by CamScanner

करण्यासाठी उमरगा नगर पालिका क्षेत्रामध्ये दुचाकींच्या वाहतूकीस प्रतिबंध करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये व फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्हयातील उमरगा नगर पालिका क्षेत्रामध्ये पुढील आदेशापर्यंत खालील नमूद बाबींकरिता होणा-या दुचाकीच्या वाहतुकीव्यतिरिक्त अन्य दुचाकींच्या वाहतुकीस मनाई करीत आहे.

1. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयात जाणे-येणेसाठी ओळखपत्राआधारे दुचाकीवर प्रवासाची परवानगी राहील.
2. अत्यावश्यक सेवेतील व्यक्तींना व कोविड-19 चे प्रतिबंधाचे अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचारी/व्यक्तींना ओळखपत्राआधारे दुचाकीवर प्रवासाची परवानगी राहील. उमरगा नगर पालिका क्षेत्रांतर्गत अत्यावश्यक सेवेसाठी व कोविड-19 चे प्रतिबंधाचे अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचारी/व्यक्तींना नगर पालिकेने ओळखपत्रे द्यावीत.
3. फिरते दूध विक्रेत्यांना दूध विक्रीसाठी दुचाकीचा वापर करण्यास परवानगी राहील.
4. तातडीच्या वैद्यकीय निकडीकरिता दुचाकीचा वापर करण्यास परवानगी राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दि. 01 ऑगस्ट 2020 पासून लागू होईल.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
2. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
3. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER उमरगा.
4. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER उमरगा.
5. मुख्याधिकारी नगर परिषद उमरगा.
6. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

30/7/20
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner